।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४३

माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि ४ ऑक्टोबर २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३९ वा

सांगोल्यातून सिलीगुडी येथे पाठविलेला १२ टन डाळिंबाचा माल गायब

ट्रक चालकांकडून परस्पर विल्हेवाट लावून १६ लाखांचा अपहार

सांगोला : सांगोला येथील ए.व्ही. ट्रान्सपोर्ट कंपनीमार्फत सिलीगुडी (पश्चिम बंगाल) येथे पाठविण्यात आलेला १२ टन डाळिंबाचा माल घेऊन ट्रक चालकांनी परस्पर विल्हेवाट लावून १६ लाख रुपयांचा अपहार केल्याची घटना समोर आली आहे.

यापक्रणी ट्रक चालकांविरुद्ध सांगोला पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून तपास सुरू आहे. याबाबत अनिल मधुकर विभुते (वय ३९, रा. ब्रम्हचैतन्य नगर, रोड क्र.२, वासुद रोड, सांगोला) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे.

अनिल विभुते यांची ए.व्हि. ट्रान्सपोर्ट कंपनी महूद रोडवरील एच.पी.पेट्रोल पंपासमोर असून, या कंपनीमार्फत शेतकरी व व्यापाऱ्यांचा माल विविध राज्यांमध्ये पाठविला जातो.

फिर्यादीनुसार, २० सप्टेंबर २०२६ रोजी रात्री आदर्श ट्रान्सपोर्ट अँण्ड लॉजिस्टिक, मुशिराबाद यांच्या माध्यमातून आयशर कंपनीचा ट्रक सांगोला येथे आला.

या ट्रकमधून सिलीगुडी येथील व्यापारी लालुभाई यांच्याकडे १२ टन डाळिंब पाठविण्याचे ठरले होते. त्यासाठी सांगोला ते सिलीगुडी १ लाख १५ हजार रुपये भाडे निश्चित करण्यात आले होते. २१ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत ट्रकमध्ये १२ टन डाळिंबाचे एकूण १,१८२ बॉक्स भरण्यात आले. माल भरल्यानंतर २१ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ट्रक सिलीगुडीकडे रवाना झाला. नियोजित वेळेनुसार सुमारे ५२ तासांत ट्रक सिलीगुडीला पोहोचणे अपेक्षित होते.

मात्र, तो तेथे पोहोचलाच नाही. २३ सप्टेंबर रोजी सकाळी सात वाजता सिलीगुडी येथील व्यापारी लालुभाई यांनी फोन करून माल अद्याप पोहोचला नसल्याचे सांगितले. तसेच दोन्ही चालकांचे मोबाईल बंद असल्याचे त्यांनी कळविले. फिर्यादीने चालकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचे मोबाईल बंद असल्याचे आढळले. मात्र, त्यानंतर दोन्ही चालकांशी संपर्क होऊ शकला नाही.

अखेर १२ टन, अंदाजे १६ लाख रुपये किमतीचा डाळिंबाचा माल सिलीगुडी येथील व्यापाऱ्याकडे न पोहोचविता परस्पर विल्हेवाट लावून अपहार केल्याचा आरोप करीत अनिल विभुते यांनी सांगोला पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.या प्रकरणी पोलिसांनी चालक कमलेश सुरेंद्र राजभर व पंचांग दास यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

रुबी हॉस्पिटलची बनावट लिंक; सांगोल्यात महिलेची ५.८१ लाखांची ऑनलाइन फसवणूक

सांगोला : वडिलांच्या उपचारासाठी रुबी हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांची अपॉइंटमेंट घेण्यासाठी गुगलवर शोधलेल्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधणे सांगोल्यातील एका कुटुंबाला चांगलेच महागात पडले. हॉस्पिटलमधून बोलत असल्याचे भासवून अज्ञात व्यक्तीने समाजमाध्यमावर पाठविलेली लिंक उघडण्यास सांगितले. या लिंकवर रुग्णाची माहिती भरून केवळ पाच रुपये ऑनलाइन भरण्यास सांगण्यात आले. मात्र, त्यानंतर संबंधित महिलेच्या युनियन बँक ऑफ इंडिया खात्यातून तब्बल ५ लाख ८१ हजार ३२२ रुपये परस्पर काढून घेत ऑनलाइन फसवणूक करण्यात आली.या प्रकरणी माधुरी मन्मथ बिरगे (रा. मेन रोड, सिदोबा गल्ली, सांगोला) यांनी मंगळवारी (दि. २९) सांगोला पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध ऑनलाइन फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माधुरी बिरगे यांच्या वडिलांच्या उपचारासाठी डॉक्टरांची अपॉइंटमेंट घेणे आवश्यक होते. त्यासाठी त्यांनी सोमवारी गुगलवर रुबी हॉस्पिटलचा मोबाइल क्रमांक शोधला. शोधातून मिळालेल्या क्रमांकावर त्यांनी संपर्क साधला. समोरील व्यक्तीने आपण रुबी हॉस्पिटलमधून बोलत असल्याचे सांगून अपॉइंटमेंटसंदर्भात माहिती घेतली.यानंतर संबंधित व्यक्तीने समाजमाध्यमाच्या माध्यमातून एक लिंक पाठविली. या लिंकवर क्लिक करून रुग्णाची आवश्यक माहिती भरावी आणि अपॉइंटमेंट प्रक्रियेसाठी पाच रुपये ऑनलाइन भरावेत, असे सांगण्यात आले. हॉस्पिटलशी संबंधित व्यक्ती असल्याचे सांगितल्याने बिरगे यांनी त्यावर विश्वास ठेवला.लिंक उघडून आवश्यक माहिती भरल्यानंतर आणि ऑनलाइन व्यवहार केल्यानंतर काही वेळातच त्यांच्या बँक खात्यातून मोठ्या रकमेचे व्यवहार झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. खात्यातून एकूण ५ लाख ८१ हजार ३२२ रुपये परस्पर काढण्यात आल्याचे समोर आले. आपल्या खात्यातील रक्कम गायब झाल्याचे लक्षात आल्यानंतर बिरगे यांनी तातडीने पोलिसांत धाव घेतली.

या घटनेमुळे ऑनलाइन माध्यमातून हॉस्पिटलची माहिती किंवा संपर्क क्रमांक शोधताना नागरिकांनी अधिक काळजी घेण्याची गरज अधोरेखित झाली आहे. गुगल किंवा समाजमाध्यमांवर आढळणाऱ्या अनोळखी क्रमांकांवर तातडीने विश्वास ठेवणे टाळावे. तसेच अनोळखी व्यक्तींनी पाठविलेल्या लिंकवर क्लिक करणे, वैयक्तिक किंवा बँकिंग माहिती भरणे आणि कोणत्याही संशयास्पद लिंकद्वारे ऑनलाइन पेमेंट करणे टाळावे, असे आवाहन करण्यात येत आहे.सांगोला पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून, फसवणुकीमागील व्यक्तीचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

महूद रोड रेल्वे गेट ५ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर दरम्यान ३ दिवस बंद

पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन

सांगोला: मध्य रेल्वेच्या पंढरपूर-सांगोला रेल्वे स्थानकादरम्यान किलोमीटर ४५७/२-३ येथे असलेले महूद रोडवरील रेल्वे गेट क्रमांक ३१ रेल्वेच्या दुरुस्ती व देखभाल कामासाठी तीन दिवस तात्पुरते बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे या मार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक बंद राहणार असून नागरिक व वाहनधारकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

मध्य रेल्वे, पंढरपूर येथील सीनियर सेक्शन इंजिनियर (रेल पथ) यांनी ३ ऑक्टोबर २०२६ रोजी पत्रकाद्वारे याबाबत माहिती दिली आहे. त्यानुसार सोमवार दि.५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून ते बुधवार दि.७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ८ वाजेपर्यंत रेल्वे गेट क्रमांक ३१ बंद राहणार आहे. या कालावधीत गेटमधून कोणत्याही प्रकारची वाहतूक करता येणार नाही. महूद, सांगोला शहर व परिसराला जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग असल्याने दुरुस्तीच्या काळात नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहनधारकांनी बंद कालावधीत या मार्गाचा वापर टाळून पर्यायी मार्गाने प्रवास करावा, असे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या बंदबाबतची माहिती एस.टी. डेपो व्यवस्थापक सांगोला व पंढरपूर, रेल्वे सुरक्षा बल पंढरपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग सांगोला, तहसीलदार सांगोला, पोलीस ठाणे (ट्राफिक विभाग) सांगोला, शहर पोलीस सांगोला तसेच नगरपरिषद सांगोला यांना देण्यात आली आहे. दुरुस्ती व देखभाल कामाच्या कालावधीत वाहतूक सुरळीत राहण्यासाठी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे आणि गैरसोय टाळण्यासाठी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

मुक्त विचार

विचारधन

विचार आणि आचार शुद्ध असतील, तर त्याचे परिणाम किंवा फळही उत्तम आणि गोड मिळते.
जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ।। तो ची साधू ओळखावा । देव तेथीची जाणावा ।।

-संत तुकाराम महाराज

पितृपक्ष : परंपरा, शास्त्र, सामाजिक मूल्य आणि पूर्वजांप्रती कृतज्ञता

भारतीय संस्कृतीची मूळ संकल्पना कृतज्ञतेवर आधारलेली आहे. 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' ही केवळ उच्चारण्याची वचने नसून, ती जगण्याची मूल्ये आहेत. मानवाच्या जडणघडणीत ज्या पूर्वजांचा, आई-वडिलांचा आणि रक्तसंबंधांचा वाटा असतो, त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्याप्रती नितांत आदर, कृतज्ञता आणि सद्भावना व्यक्त करण्याचा पंधरवडा म्हणजेच 'पितृपक्ष'. याला 'महालय पक्ष' किंवा 'पितृ पंधरवडा' असेही म्हटले जाते. भाद्रपद महिन्यातील वद्य (कृष्ण) प्रतिपदेपासून ते सर्वपित्री अमावास्येपर्यंतचा हा काळ आत्मचिंतनाचा, पूर्वज स्मरणाचा आणि दानाचा मानला जातो.

१. पितृऋण आणि पितृपक्षाची पार्श्वभूमी

हिंदू धर्मशास्त्रांनुसार मानवाच्या आयुष्यावर तीन प्रकारची प्रमुख ऋणे (कर्जे) मानली गेली आहेत:

१. देवऋण: विश्वातील पंचमहाभूते आणि निसर्गाचे आपल्यावर असणारे उपकार.

२. ऋषीऋण: ज्या ऋषी-मुनींनी, विचारवंतांनी ज्ञान, वेद आणि संस्कृती आपल्याला दिली, त्यांचे ऋण.

३. पितृऋण: ज्या कुळात आपण जन्म घेतला, ज्यांनी आपले संगोपन केले, रक्षण केले आणि संस्कार दिले, त्यांचे ऋण.

देवऋण यज्ञाने आणि ऋषीऋण स्वाध्यायाने (शिक्षणाने) फेडले जाते, तर पितृऋण फेडण्यासाठी श्राद्ध, तर्पण आणि सदाचाराची गरज असते. गरुड पुराण, मनुस्मृती आणि विष्णु पुराणात पितृपक्षाचे महत्त्व विशद करताना सांगितले आहे की, भाद्रपद वद्य पक्षात सूर्य कन्या राशीत प्रवेश करतो, तेव्हा पितृलोकातील आत्मे पृथ्वीच्या निकट येतात. या काळात वंशजांकडून मिळालेली जलांजली आणि अन्नाचा अंश त्यांच्या आत्म्याला तृप्ती देतो.

२. प्रमुख धार्मिक विधी आणि संकल्पना

पितृपक्षात पूर्वजांच्या स्मरणार्थ प्रामुख्याने तीन गोष्टी केल्या जातात:

तर्पण: दर्भाच्या (कुशा) साहाय्याने हाताच्या अंगठ्यावरून पाणी, काळे तीळ आणि दूध अर्पण करून पूर्वजांना तृप्त करण्याची क्रिया म्हणजे तर्पण. 'तृप्यन्ति अनेन इति तर्पणम्' अशी याची व्याख्या केली जाते.

पिंडदान: शिजवलेला भात, काळे तीळ, तूप आणि मध एकत्र करून तयार केलेल्या पिंडांचे विधिवत पूजन करून ते अर्पण केले जातात. मानवी शरीर अन्नमय कोषापासून बनलेले असते, त्यामुळे पिंडरूपाने प्रतिकात्मक शरीर अर्पण करण्याचा हा भाव असतो.

श्राद्ध: 'श्रद्धया क्रियते इति श्राद्धम्' - म्हणजेच अत्यंत श्रद्धेने, पूर्वजांच्या स्मृतीला आदरपूर्वक वंदन करून केले जाणारे कर्म म्हणजे श्राद्ध. ज्या तिथीला पूर्वजांचे निधन झाले असेल, पितृपक्षातील त्याच तिथीला त्यांचे श्राद्ध केले जाते.

३. पितृपक्षातील विशेष तिथी

पितृपक्षातील सर्वच तिथी महत्त्वाच्या असल्या, तरी काही तिथींना विशिष्ट परंपरा जोडली गेली आहे:

भरणी श्राद्ध (चतुर्थी किंवा पंचमी): पितृपक्षातील भरणी नक्षत्र ज्या दिवशी येते, त्या दिवशी भरणी श्राद्ध केले जाते. गया येथे जाऊन श्राद्ध केल्याइतके पुण्य या दिवशी मिळते असे मानले जाते.

अविधवा नवमी (नवमी तिथी): ज्या स्त्रियांचे निधन पती हयात असताना (सुवासिनी असताना) झाले आहे, त्यांचे श्राद्ध नवमीच्या दिवशी केले जाते. या दिवशी सवाष्ण आणि ब्राह्मण भोजनाला विशेष महत्त्व असते.

एकादशी आणि द्वादशी: संन्यासी, साधू किंवा संन्यास घेतलेल्या पूर्वजांचे श्राद्ध द्वादशी (द्वादशी/त्रयोदशी) तिथीला केले जाते.

घात चतुर्दशी (चौदावी तिथी): ज्या व्यक्तींचा मृत्यू अपघातात, शस्त्रास्त्रांनी, विषबाधेने, पाण्यात बुडून किंवा कोणत्याही अस्वाभाविक/अचानक कारणाने झाला असेल, त्यांचे श्राद्ध चतुर्दशीला केले जाते.

मातामह श्राद्ध (आश्विन शुक्ल प्रतिपदा): आजोळच्या पूर्वजांसाठी (आईचे वडील म्हणजेच आजोबा) हे श्राद्ध सर्वपित्री अमावास्येनंतरच्या दुसऱ्या दिवशी (प्रतिपदेला) केले जाते.

४. तिथी माहिती नसल्यास काय करावे?

जर काही कारणास्तव दिवंगत व्यक्तीची अचूक तिथी माहिती नसेल, विसर पडला असेल किंवा ठरलेल्या तिथीला श्राद्ध करणे शक्य झाले नसेल, तर खालील पर्याय शास्त्रात सांगितले आहेत:

सर्वपित्री अमावास्या: ही पितृपक्षातील शेवटची तिथी असते. ज्यांची तिथी ज्ञात नाही, अशा सर्व ज्ञात-अज्ञात पितरांचे श्राद्ध सर्वपित्री अमावास्येला केले जाते.

पौर्णिमा श्राद्ध: ज्या पूर्वजांचे निधन कोणत्याही महिन्याच्या पौर्णिमेला झाले असेल, त्यांचे श्राद्ध भाद्रपद पौर्णिमेला (पितृपक्ष सुरू होण्याच्या आदल्या दिवशी) केले जाते.

५. श्राद्ध करण्यासाठी दिवसाची योग्य वेळ

श्राद्ध विधी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी/रात्री केले जात नाही. यासाठी दिवसाचा मध्यकाळ सर्वोत्तम मानला जातो:

कुतूप आणि रोहिणी मुहूर्त: दिवसाचे पंधरा मुहूर्त असतात, त्यापैकी आठवा मुहूर्त कुतूप (साधारणपणे दुपारी ११:३० ते १२:३० च्या दरम्यान) आणि नववा मुहूर्त रोहिणी हा श्राद्ध, तर्पण आणि पिंडासाठी सर्वोत्तम मानला जातो.

अपराह्ण काळ: सूर्य मध्यान्हावरून कलू लागल्यानंतरचा काळ (दुपारी १२ ते ३:३०) श्राद्ध कर्मासाठी योग्य मानला जातो.

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-४७ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात साजरा;९० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठांचा सन्मान

सांगोला : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, सहाय्यक आयुक्त कल्याण कार्यालय, सोलापूर, महात्मा बसवेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, श्री सिद्धिविनायक महिला ज्येष्ठ नागरिक संघ, सांगोला आणि श्री समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने १ ऑक्टोबर जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व प्रार्थनेने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. वसंतराव दिघे होते. प्रास्ताविकात श्री सिद्धिविनायक महिला ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षा सौ. आशा सलगर यांनी १ ऑक्टोबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट केला. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, त्यांच्याबाबत जनजागृती तसेच समाजात ज्येष्ठांप्रती आदरभाव निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १४ डिसेंबर १९९० रोजी १ ऑक्टोबर हा दिवस ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून पाळण्याचा ठराव पारित केल्याचे त्यांनी सांगितले.

ज्येष्ठांचे जीवन सुखकारक, आनंदी व आत्मप्रतिष्ठेचे व्हावे, तसेच त्यांचे बहुमोल ज्ञान, प्रगाढ अनुभव व कौशल्याचा समाजाला लाभ व्हावा, यासाठी महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेसकॉम) प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात वयाची ९० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. तसेच उपस्थित इतर ज्येष्ठ नागरिकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. शेतकरी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन डॉ. प्रभाकर माळी यांनी मनोगतात ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याविषयी बहुमोल मार्गदर्शन केले.

शासनाच्या आरोग्यविषयक योजना केवळ ठराविक रुग्णालयांपुरत्या मर्यादित न ठेवता सर्वसामान्य ज्येष्ठ नागरिकांना त्यांचा लाभ सर्व रुग्णालयांमध्ये मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रमुख पाहुण्या महिला सूतगिरणीच्या चेअरमन श्रीमती कल्पनाताई शिंगाडे यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले. ज्येष्ठांसाठीच्या शासकीय योजनांमध्ये असलेली उत्पन्नाची अट शिथिल करण्याची मागणी त्यांनी केली.

कोळा येथील सेवानिवृत्त केंद्रप्रमुख श्री. करांडे साहेब यांनी अध्यात्माच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांनी आनंदी व समाधानी जीवन कसे जगावे, याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी अभंग व गवळणी सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. ज्येष्ठ महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. काही महिलांनी अभंग व गवळणी सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

सोलापूर येथून उपस्थित असलेले समाजकल्याण विभागाचे श्री. मुकुंद लोंढे यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. यावेळी त्यांचा शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी श्री समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव श्री. अरुण वाघमोडे गुरुजी यांनी आभार मानले.

पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. यानंतर उपस्थित ज्येष्ठ नागरिकांनी सहभोजनाचा आनंद घेतला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. अनिल कांबळे, बाबा बनसोडे, गंगाराम इमडे व प्रभाकर कसबे यांनी मोलाचे सहकार्य केले.

ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची कामे गतीने पूर्ण करा- जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

अपूर्ण पाणीपुरवठा योजनांचा आढावा; ग्रामपंचायतींनी योजनांसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून द्यावी

सोलापूर: जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता मिशनच्या माध्यमातून ग्रामीण भागात राबविण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा योजनांच्या सद्यस्थितीचा जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आला. अपूर्ण असलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे गतीने पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. काटकर, वरिष्ठ भूवैज्ञानिक मुस्ताक शेख तसेच सर्व तालुक्यांतील पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध पाणीपुरवठा योजनांच्या सद्यस्थितीचा जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सविस्तर आढावा घेतला. जल जीवन मिशनमधील निविदा चौकशी समितीच्या आक्षेपांमुळे १८९ कामांची देयके प्रलंबित असल्याबाबतही यावेळी माहिती घेण्यात आली. सांगोला, अक्कलकोट व बार्शी तालुक्यांतील अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची तपशीलवार माहिती घेऊन या योजना पूर्ण न होण्यामागील कारणांचा जिल्हाधिकारी यांनी आढावा घेतला. संबंधित ठेकेदारांना कामाची रक्कम देण्याबाबत पालकमंत्र्यांशी विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

जल जीवन मिशनच्या कामांसाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्याबाबत कार्यवाही करावी. अपूर्ण पाणीपुरवठा योजनांमध्ये अनेक ठिकाणी विहीर व पाण्याच्या टाकीसाठी ग्रामपंचायतींकडून आवश्यक जागा उपलब्ध करून दिली जात नसल्याचे आढळून आले आहे. ज्या ग्रामपंचायती पाणीपुरवठा योजनेसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देत नाहीत, त्यांच्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियमानुसार कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

शिरभावी पाणीपुरवठा योजनेचा आढावाः सांगोला तालुक्यातील ८२ गावांसाठी असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या शिरभावी पाणीपुरवठा योजनेचाही यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.

योजनेची सद्यस्थिती, प्रलंबित काम तसेच आवश्यक उपाययोजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली.

सोलापूर जिल्ह्याच्या डिजिटल विश्वात शिवसेनेची प्रभावी मोर्चे बांधणी.!

जिल्हा कार्यकारिणी जाहीर; तब्बल २५८ शिलेदारांच्या खांद्यावर नव्याने जबाबदारी

सांगोला : शिवसेना पक्षाची धगधगती विचारधारा, ध्येयधोरणे आणि राज्य सरकारने घेतलेले जनहितकारी निर्णय तळागाळातील व शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी शिवसेना सोशल मीडिया सोलापूर जिल्ह्याची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. याअंतर्गत जिल्हा पातळीपासून ते थेट पंचायत समिती गणप्रमुखांपर्यंत एकूण २५३ पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देऊन त्यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे व स्व. धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने, शिवसेचे शीर्षस्थ नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार या निवडी करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्याच्या सोशल मीडिया उपराज्यप्रमुख प्रतिक शर्मा यांच्या तसेच पश्चिम महाराष्ट्र प्रमुख महादेव सलवदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सोशल मीडिया संपर्कप्रमुख अमित पाटील यांच्या नेतृत्वाखाली नव्याने अधिकृतपणे करण्यात आलेल्या निवडीची संख्या पुढील प्रमाणे.

जिल्हा संपर्कप्रमुख-१,सोलापूर लोकसभा प्रमुख- १,माढा लोकसभा प्रमुख -१,जिल्हाप्रमुख- १,जिल्हा समन्वयक -१,जिल्हा संघटक१,सोलापूर शहर प्रमुख-१,तालुका प्रमुख-११, विधानसभा प्रमुख११,शहर प्रमुख-१४,तालुका व शहर समन्वयक- १३,जिल्हा परिषद गटप्रमुख-६८ पंचायत समिती गणप्रमुख-१३६ असे एकूण २५३ पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर या मोहिमेचा एक भाग म्हणून सोलापूर जिल्ह्यातील सोशल मीडिया पदाधिकाऱ्यांचे अधिकृत नियुक्तीपत्रे काढू न करण्यात आली असून शासनाच्या योजनांचा प्रचार-प्रसार करणे, पक्षाची भूमिका अधिकृतरीत्या मांडणे आणि डिजिटल माध्यमातून नागरिकांच्या समस्यांना वाचा फोडणे हे या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे मुख्य ध्येय राहणार असून या व्यापक कार्यकारिणीमुळे सोलापूर जिल्ह्यात शिवसेनेचे सोशल मीडिया जाळे अधिक मजबूत होईल असा विश्वास यावेळी माध्यमांशी बोलताना संपर्कप्रमुख अमित पाटील यांनी व्यक्त केला.

महिला सूतगिरणीची ३२ वी वार्षिक सभा उत्साहात संपन्न

सांगोला : शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूतगिरणी मर्या सांगोले या संस्थेची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दि.२४.०९.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस प्रमूख पाहूण्या म्हणून स्व. भाई गणपतरावजी देशमुख याच्या सुविदय पत्नी रतनबाई देखमुख, सांगोला तालुक्याचे विदयमान आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख हे उपस्थित होते. सभेच्या सूरूवातीस सर्व मान्यवरांच्या हस्ते स्व. भाई गणपतरावजी देशमुख यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संस्थेच्या व्हा. चेअरमन सौ. वंदनाताई बाबर यांनी उपस्थितांचे स्वागत केले त्यानंतर संस्थेच्या चेअरमन श्रीमती. कल्पनाताई शिंगाडे यांनी अहवाल सालात निधन झालेल्या ज्ञात अज्ञात व्यक्तींच्या श्रध्दांजलीचा ठराव मांडला. श्रध्दांजली ठरावानंतर त्यांनी संस्थेच्या कामकाजाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेच्या कामकाजास सुरूवात झाली. विषयाचे वाचन व स्पष्टिकरण श्री. शिरदाळे डी. आर व नंदा कुंभार यांनी केले.

विषयपत्रिकेवरील विषय संपलेनंतर शारदाताई वाघमारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले शेवटी मा. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सभेस मार्गदर्शन केले. त्यांनी आपले मार्गदर्शन पर भाषणात बाजारपेठेत वाढलेले कापसाचे दर, वाढते विज दर, सूताच्या दरातील अस्थिरता यामूळे वस्त्रोदयोग सदया तोटयात असून ब-याच सूतगिरण्या बंद आहेत. आपले गिरणीस आर्थिक सहाय्य मिळविणेसाठी प्रयत्न करून बँका व शासन यांचेकडून आपण कर्ज उभारणी करून घेऊ व जास्तीत जास्त महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देऊ. असे नमुद केले.

सदर सभेसाठी अवधूत कूमठेकर, प्रा. तानाजी बाबर, मिनाक्षी येडगे, कौशल्या शिंदे इत्यादि मान्यवर उपस्थित होते. त्याचप्रमाणे संस्थेच्या संचालिका राजश्री जाधव, शुभांगी पाटील, नम्रता जोशी, शालन हजारे, विमल बंडगर, सुरेखा मदने, स्मिता बनसोडे, उज्वला वाघमोडे, द्रोपदी भगत, मायाक्का यमगर, रतन बनसोडे, गोकूळा मिसाळ संस्थेचे पदाधिकारी कर्मचारी व कामगार उपस्थित होते. त्याचबरोबर मोठ्या संख्येने सभासद भगिनीही उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. बी. एम बिराजदार यांनी केले व संचालिका सौ. शुभांगी पाटील यांनी उपस्थीतांचे आभार मानुन सभा संपन्न झाली.

सांगोला आगारातून एनसीएमसी कार्डसाठी तब्बल ४० हजार ३०९ प्रवाशांनी नोंदणी

एनसीएमसी कार्डच्या सक्तीवरून प्रवासी वर्गातून नाराजी

सांगोला : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) सवलतीच्या प्रवासासाठी आवश्यक असलेल्या एनसीएमसी स्मार्ट कार्ड काढण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबर रोजी संपली.

सांगोला आगारातून अंतिम मुदतीपर्यंत तब्बल ४० हजार ३०९ प्रवाशांनी एनसीएमसी कार्डसाठी नोंदणी केली असून, त्यापैकी २७ हजार ८८९ प्रवाशांना कार्ड प्राप्त झाले आहे. सांगोला तालुक्यात सांगोला आगाराव्यतिरिक्त एनसीएमसी कार्ड देण्यासाठी २२ एजंट कार्यरत आहेत.

मात्र, या एजंटांकडून अद्याप अंतिम आकडेवारी प्राप्त झालेली नसल्याने सांगोला आगाराकडील उपलब्ध आकडेवारीनुसार २७ हजार ८८९ कार्ड वितरित झाल्याचे समोर आले आहे.

नोंदणी केलेल्या ४० हजार ३०९ प्रवाशांमध्ये ७५ वर्षांवरील अमृत ज्येष्ठ नागरिक ५ हजार २०५, ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक ३ हजार ५९२, महिला ऑक्टोबरपासून एनसीएमसी कार्ड असलेल्या प्रवाशांनाच एसटी महामंडळाच्या सवलतीच्या दरात प्रवास करता येणार असून, कार्ड नसल्यास प्रवाशांना पूर्ण तिकीट दर भरावा लागणार आहे. त्यामुळे अंतिम मुदतीपर्यंत नोंदणी करूनही कार्ड न मिळालेल्या प्रवाशांसमोर अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

सवलत योजनेतील ३१ हजार ३४५ आणि इतर १६७ प्रवाशांचा समावेश आहे. त्यापैकी ३० सप्टेंबरअखेर ३ हजार ८०४ अमृत ज्येष्ठ नागरिक, २ हजार ७०६ ज्येष्ठ नागरिक, महिला योजनेतील २१ हजार २७७ आणि इतर १०२ प्रवाशांना एनसीएमसी कार्ड प्राप्त झाले आहे. दरम्यान, एनसीएमसी कार्डच्या सक्तीवरून प्रवासी वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे.

नीरा उजवा कालव्याचे आवर्तन १५ ऑक्टोबरपर्यंत सुरू ठेवा

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी

सांगोला : सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन वीर धरणातून सुरू असलेले नीरा उजवा कालव्याचे खरीप हंगाम २०२६-२७ चे सिंचन आवर्तन १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सुरू ठेवण्याची मागणी केली. सांगोला मतदारसंघातील चिंचोली तलाव तसेच पंढरपूर तालुक्यातील तिसंगी व सोनके तलावांमध्ये आवश्यक पाणीसाठा उपलब्ध होणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

आगामी काळातील पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता या तलावांमध्ये आवश्यकतेनुसार पाणी सोडण्याबाबत जलसंपदा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने निर्देश देण्याची मागणी त्यांनी केली. शेतकरी व नागरिकांच्या पाणीप्रश्नाचा विचार करून वीर धरणातून नीरा उजवा कालव्याचे आवर्तन १५ ऑक्टोबरपर्यंत सुरू ठेवावे, तसेच पक्षपंधरवड्यानिमित्त माडगुळकर ज्वेलर्स २९ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबरदरम्यान बंद तिसंगी, सोनके आणि चिंचोली तलावांमध्ये आवश्यकतेनुसार पाणी सोडावे, अशी मागणी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार डॉ. देशमुख यांची मागणी गांभीर्याने ऐकून घेत याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले. नीरा उजवा कालव्याच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांच्या पिकांसाठी तसेच आगामी पिण्याच्या पाण्याच्या नियोजनासाठी ही मागणी महत्त्वाची ठरणार आहे.

पोलिस असल्याची बतावणी करून एका ६९ वर्षीय वृद्धाला अडवून त्याच्या अंगावरील तब्बल २ लाख ८० हजार रुपये किमतीचे पळविले सोन्याचे दागिने

सांगोला : महूद ते दिघंची-आटपाडी मार्गावर पोलिस असल्याची बतावणी करून एका ६९ वर्षीय वृद्धाला अडवून त्याच्या अंगावरील तब्बल २ लाख ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दोन अनोळखी इसमांनी मोटारसायकलवरून येत वृद्धाला रस्त्यात अडविले. 'आम्ही पोलीस आहोत, तुमची झडती घ्यायची आहे,' असे सांगत संवाद सुरू केला. त्यानंतर त्यापैकी एका इसमाने रुमाल वृद्धाच्या तोंडावर फिरविल्यानंतर काही काळ आपल्याला काहीच कळले नाही, अशी फिर्याद वृद्धाने सांगोला पोलिस ठाण्यात दिली आहे. या घटनेमुळे महूद परिसरात खळबळ उडाली असून, पोलिस असल्याची बतावणी करून नागरिकांना लुटणाऱ्या टोळीच्या हालचालींबाबत नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.

कटफळ येथील हरिदास साधू बंडगर (वय ६९) हे ३० सप्टेंबर रोजी महूद येथे कामानिमित्त आले होते. काम आटोपून दुपारी सुमारे चार वाजता ते मोटारसायकलवरून कटफळकडे निघाले होते. महूद ते दिघंची- आटपाडी मार्गावरील पाण्याच्या टाकीजवळ पोहोचताच मागून मोटारसायकलवर आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांना अडविले. 'गाडी साईडला घ्या, आम्ही पोलीस आहोत. तुमची झडती घ्यायची आहे,' असे त्यांनी सांगितले. 'माझी झडती कशासाठी? मी काय केले आहे?' असा सवाल बंडगर यांनी केला. त्याच क्षणी पुढे बसलेल्या इसमाने हातातील रुमाल त्यांच्या तोंडावर फिरविला. त्यानंतर वृद्धाला काहीच कळाले नाही. काही वेळाने भानावर आल्यानंतर गळ्यातील सोन्याची चैन आणि हातातील सोन्याची अंगठी नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. क्षणातच विशासाचा गैरफायदा घेत दोन अनोळखी इसमांनी सोन्यावर हात साफ केल्याचे त्यांच्या लक्षात आले.

या घटनेत वृद्धांच्या हातातील १ लाख रुपये किमतीची १७ ग्रॅम सोन्याची अंगठी, १ लाख ८० हजार रुपये किमतीची तीन तोळे वजनाची सोन्याची चैन असा एकूण २ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. घडलेला प्रकार लक्षात येताच बंडगर यांनी मुलगा संभाजी याला फोन करून माहिती दिली. संभाजी घटनास्थळी आल्यानंतर दोघांनी महूद, कटफळ तसेच पंढरपूर, अकलूज आणि सांगोला रोड परिसरात संशयितांचा शोध घेतला. मात्र मोटारसायकलवरून आलेले ते दोन्ही अनोळखी इसम कुठेच आढळले नाहीत. अखेर शोध घेऊनही संशयितांचा मागमूस न लागल्याने बंडगर यांनी मुलासह सांगोला पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. महूद परिसरात घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिस असल्याचे सांगून रस्त्यात अडवणाऱ्या अनोळखी व्यक्तींबाबत नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडून सांगोला तालुक्यात दुष्काळी परिस्थितीची पाहणी पिकांचे नुकसान, पाणीटंचाई व चारा उपलब्धतेचा घेतला आढावा; पंचनामे सरसकट व अचूक करण्याचे निर्देश

सांगोला : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी शुक्रवारी सांगोला तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, कोरड्या पडलेल्या विहिरी तसेच जनावरांसाठी उपलब्ध चाऱ्याची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व मागण्या जाणून घेतल्या. तसेच पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सरसकट पंचनामे करून नुकसानीची वस्तुनिष्ठ व अचूक नोंद घेण्याच्या सूचना दिल्या.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सांगोला तालुक्यातील वाकी(घेरडी), बुरलेवाडी, वाडेगाव, वाणीचिंचोळी आणि राजापूर या गावांना भेटी देऊन दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता, नाझरा बीट एक व दोनमध्ये 'सेवा संकल्प अभियान' विहिरींची पाणीपातळी, जनावरांसाठी उपलब्ध चारा तसेच पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली.

दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले. उपविभागीय अधिकारी माळी यांनी सांगोला तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली. तसेच प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती देऊन पिकांच्या नुकसानीचे पंचनामे सरसकट करण्यात येत असल्याचे सांगितले. निर्धारित कालावधीत पंचनाम्यांचे अहवाल जिल्हा प्रशासनास सादर करण्यात येतील, अशी माहिती त्यांनी दिली.

यावेळी सांगोला तहसीलदार बाळूबाई भागवत, सांगोला तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव, संबंधित मंडल अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक तसेच संबंधित गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व मागण्या जाणून सांगोला तालुक्यातील विविध गावांतील शेतकऱ्यांनी पिकांच्या नुकसानीपोटी मिळणारे अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावे, अशी मागणी केली. तसेच पिण्याच्या पाण्याचे नियोजन व जनावरांसाठी पाणी व चाऱ्याचे नियोजन करावे. चाऱ्याची कमतरता निर्माण झाल्यास चाऱ्यासाठीचे अनुदानही थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात उपलब्ध करून द्यावे. चारा डेपो किंवा चारा छावण्या सुरू करण्याऐवजी थेट आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणीही शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

यावेळी नुकसानीचे पंचनामे पूर्ण करून शासनाकडून मदत मिळण्यासाठी प्रशासनामार्फत वेळेत प्रस्ताव सादर करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.